REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2022

# वर्धा जिल्ह्यातील बाल कामगारांची समस्या : एक समाजशास्त्रीय अध्ययन

डॉ. गणेश एन. बहादे
श्री. साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर, ता. हिंगणघाट, जि. वर्धा

**सारांश**



"बाल कामगार म्हणजे ज्या कामगारांचे वय १४ वर्षाच्या आत असते अशा कामगारांस बाल कामगार असे म्हटले जाते."

संपूर्ण जगभर ज्या समस्येने अक्राळविक्राळ स्वरुप धारण केले ती समस्या म्हणजे बाल कामगार समस्या होय. विकसित, विकसनशील व अविकसित राष्ट्राच्या प्रगतीच्या आड येणारा ज्वलंत व आजपर्यंत न उलगडलेला हा मोठा प्रश्न आहे. बाल कामगारांच्या व्याप्तीच्या दृष्टीने आपणास जागतिक व्याप्तीकडे लक्ष केंद्रीत करावे लागेल. जगातील सर्व खंडामध्ये बालकांचे शोषण थांबविण्यासाठी कायदे अस्तित्वात आहेत. त्यावर अनेक परिचर्चा होतात, ठराव पारित होतात आणि बालकांना स्वरंक्षण देण्याकरिता कृती योजना आखण्यात येतात; तरीपण बालकांच्या स्वरंक्षणासाठी फार काही होऊ शकले नाही, दिवसेंनदिवस ही समस्या वाढतच आहे. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने प्रसिद्ध केलेल्या अहवालात म्हटले आहे की, जगातील लक्षावधी बालकांना जबरदस्तीने कामाला लावले जाते. अनेकवेळा अशा धोकादायक आणि बेकायदेशीर कामाला लावले जाते, त्यांच्यापैकी बरेचसे मोठ्या संख्येने वेश्या व्यवसाय आणि अमली पदार्थ विकण्याच्या कामात गुंतले आहेत. बरीच बालके शिक्षणाशिवाय वाढतात आणि जन्मभर दारिद्र्य भोगतात. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये वर्धा जिल्ह्यातील बाल कामगारांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करण्यात आलेला आहे.

**शब्दसंकेत :–** बाल कामगार, दारिद्र्य, बेरोजगारी, शिक्षण, संविधान.

## प्रस्तावना

बाल कामगार ही आधुनिक काळातील ज्वलंत समस्या आहे. बाल कामगारांची समस्या ही एक मिश्र समस्या आहे. यामध्ये सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, शारीरिक बाबी समाविष्ट आहेत. त्यातुन अनेक सामाजिक समस्या उद्‌भवतात. यामुळे बालकांचे व्यक्तिमत्व, भावविश्व उध्वस्त होते. त्यांचा उत्कर्ष, विकास खुंटतो. समाजाची विकासाकडील होणारी झेप मंदावते. बाल मजूरीची प्रथा ही कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेवर एक फार मोठे ओझे आहे. बाल कामगारांची समस्या ही आजच्या काळात संपूर्ण जगामध्ये अत्यंत महत्वाची व सर्वांशी संबंधीत अशी समस्या आहे. विशेषत: अविकसीत आणि विकसनशील देशांमधील बाल कामगारांची वाढती संख्या याकडे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर, सामाजिक संस्था आणि शास्त्रज्ञ यांचे लक्ष वेधून घेतले आहे. स्वातंत्र्यानंतर संविधान निर्मात्यांनी बाल कामगार ही समस्या नष्ट करण्यासाठी कलम २४ नुसार मौलिक अधिकाराच्या माध्यमाने १४ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांना कारखान्यात तसेच इतर ठिकाणी कामावर लावणे यावर प्रतिबंध लावला आहे. जरी त्या दूर करण्याची जबाबदारी सरकारची असली तरी त्याकरिता जनसहयोगाची नितांत गरज आहे.

बाल कामगार ही काही नव्याने उद्‌भवलेली समस्या नसुन भारतात फार पूर्वीपासून चालत आलेली प्रथा आहे. इ. स. पूर्व ३०० मध्ये कौटिल्याच्या अर्थशास्त्रात बाल सेवक, कुलन असा बाल कामगारांचा उल्लेख आढळतो. मध्ययुगाच्या काळात देखिल ही

प्रथा अस्तित्वात होती. या पद्धतीनुसार संरजामदाराकडे गरिब लोकांना त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना व लहान बालकांना देखिल वेठबिगारी करावी लागत असे. १८६० मध्ये इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाल्यानंतर संपूर्ण समाज व्यवस्थेची अर्थव्यवस्था जागतिक पातळीवर बदलली व सरंजामशाही अस्तानंतर भांडवलशाही समाज व्यवस्थेची याच काळात निर्मिती झाली. श्रमाची मोठी बाजारपेठ या भांडवलशाहीवर आधारीत समाजव्यवस्थेत निर्माण झाली, प्रचंड प्रमाणात औद्योगिकरण झाले. याचा परिणाम सर्व जगावर होऊन जगात मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले. अनेक लोकांना औद्योगिकरणामुळे रोजगार मिळाले. यामुळे ग्रामीण लोक शहराकडे आकर्षित झाले. तेथे गेल्यावर स्वत:च्या नव्हे तर कुटुंबाच्या गरजांची पूर्तता करता यावी म्हणून बालकांना कामास लावण्यास सुरुवात झाली.

१५० वर्षापूर्वी युरोप आणि अमेरिका या दोन देशामध्ये बाल कामगारांची समस्या समोर आली. लोकांचे लक्ष मिठाईच्या दुकानावर काम करणाऱ्या लहान मुलांकडे गेले, त्या मुलांकडून जास्तीत जास्त तास काम करुन घेतल्या जात होते किंवा धोकादायक व खराब कार्य करण्यास मजबूर केल्या जात होते. २० व्या शतकाच्या सुरुवातीला बाल कामगारांचा विषय संपूर्ण जगामध्ये चिंतेचा विषय बनला. बाल कामगारा विरुद्ध समोर येणाऱ्या या चिंतेचे मुख्य श्रेय आंतरराष्ट्रीय कामगार संघटनाला जाते, ज्यांची स्थापना पहिल्या महायुद्धा नंतर १९१९ मध्ये झाली. आणि ज्याचे सामाजिक न्यायाचे सिद्धांत पूर्णपणे बाल कामगार प्रथेच्या विरुद्ध होते या संघटनेच्या उद्देशिकामध्ये असे होते की, कमी वयातील बालक कोणत्याही औद्योगिक संस्थेमध्ये काम करु शकत नाही. कैलास सत्यार्थी यांनी १९८० मध्ये स्थापन झालेल्या बचपन बचाओ आंदोलनामार्फत बाल कामगारांसाठी कार्य करुन अनेक बाल कामगारांना शिक्षणाच्या प्रवाहामध्ये आणण्याचे काम केले. या कार्याबद्दल त्यांना २०१४ मध्ये नोबेल देऊन गौरविण्यात आले.

## संशोधनाची उद्दिष्ट्ये

१) वर्धा जिल्ह्यातील बाल कामगारांचा समाजशास्त्रीय अभ्यास करणे.

२) मुले कामाकडे वळण्याच्या कारणांचा शोध घेऊन त्यावर उपाययोजना सुचविणे.

## वर्धा जिल्ह्यातील बाल कामगार

सन २०११ नुसार वर्धा जिल्ह्याची एकूण लोकसंख्या १३००७७४ एवढी आहे. त्यापैकी ६६८३८५ पुरुष व ६३२३८९ स्त्रिया आहेत. जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ग्रामीण लोकसंख्या ८७७४७४ असून नागरी लोकसंख्या ४२३३०० एवढी आहे. यात ग्रामीण भागात ० ते ६ वयोगटातील बालकांची संख्या ८८२२४ तर शहरी भागातील बालकांची संख्या ४०६६७ एवढी आहे. तसेच सन २००१ मध्ये वर्धा जिल्ह्यातील बाल कामगारांची संख्या ५१७४ होती तर सन २०११ मध्ये कमी होऊन १६६० झाली. महाराष्ट्र व भारताचा विचार करता सन २०११ मध्ये बाल कामगारांची संख्या अनुक्रमे ४९६९१६ व ४३५३२४७ होती.

## मुले कामाकडे वळण्याचे विविध कारणे

### १) दारिद्र्य

मुले लहान वयामध्ये काम का करतात, याचे सर्वात जवळचे कारण म्हणजे दारिद्र्य होय. दारिद्र्य हा घटक बाल मजूरीचे कारण व परिणाम आहे. कोणत्याही आई वडीलांना असे वाटत नाही की आपल्या मुलाला कामाला पाठवावे. परंतु गरिबी व दैनंदिन गरजांची पूर्तता न झाल्याने ते आपल्या मुलाला कामास पाठविण्यास मजबूर असतात. कुटुंबामध्ये पिढ्यानपिढ्या चालत आलेली गरिबी, शेतीसारखा कष्टाचा व्यवसाय करण्यासाठी दिवसभर राबत असतात. एवढे करुनही गरजा पूर्ण होत नसल्यामुळे आपल्या मुलांना शाळेत पाठवण्याऐवजी कामाला पाठवतात.

### २) कर्जाचा भार

आई वडील हे काही कारणासाठी कर्ज घेतात जसे, घर बांधणे, कुटुंबातील सदस्याचे दिर्घ आजारपण, बेरोजगारी. परंतु आई वडीलाकडून कर्ज देणे शक्य झाले नाही की ते आपल्या मुलाला कामावर नेतात व त्याच्या मदतीने कर्ज फेडतात. जर कर्ज देणारा मोठा शेतकरी असला तर तो कर्ज घेणाऱ्या व्यक्तीच्या मुलाला गुरेढोरे चरायला नेणे अशी कामे देतो. काही मुले कर्ज देणाऱ्याच्या घरीच घरगुती काम करतात.

### ३) आई-वडीलांची बेरोजगारी

प्रौढ व्यक्तिला कामाला ठेवले तर त्यांना जास्त मजूरी द्यावी लागते परंतु त्याच कामाला लहान मुलांना ठेवले तर त्याला कमी मजूरी दिली तरी चालते अशी मालक वर्गाची भावना असते. याच कारणामुळे ते प्रौढ व्यक्तिला कामाला न ठेवता लहान मुलांना कामावर ठेवतो. प्रौढ व्यक्तिला काम मिळत नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ येते व आई वडीलांना मजबूर होऊन आपल्या लहान मुला मुलींना कामावर पाठवावे लागते.

### ४) आई-वडीलांचे आजारपण

भारतीय कुटुंबामध्ये गरिबीचे प्रमाण जास्त आहे. गरिबी असल्यामुळे पोषक अन्न मिळत नाही. आवश्यक तेवढ्या कॉलरीज त्यांना मिळत नाहीत त्यामुळे त्यांचे आरोग्य बिघडते. वेळेवर उपचार झाला नाही तर ते वाढतच जाते. आई वडील आजारी असल्यामुळे ते कामाला जाऊ शकत नाहीत. अशा वेळी ते आपल्या मुलाला काम करण्यास पाठवतात.

### ५) पारंपारीक व्यवसाय

ग्रामीण भागातील अधिकतर मुले कोणत्या ना कोणत्या कामामध्ये व्यस्त असतात. कारण ग्रामीण भागामध्ये अनेक परंपरागत असे व्यवसाय आजही केले जातात. मुलांचे आई वडील मुलाला शाळेत पाठविण्याऐवजी आपला व्यवसाय शिकविण्यावर भर देतात, यामुळे मुलाला शिक्षणाविषयी आवड निर्माण न होता कामाविषयी आवड निर्माण होते व तो तेच काम करतो.

### ६) महिलांसाठी कामाच्या कमी संधी

बाल कामगारांच्या कारणामध्ये एक महत्वाचे कारण म्हणजे महिलांसाठी कामाच्या कमी संधी असणे हे होय. औद्योगीक व सेवा क्षेत्र महिलांसाठी पाहिजे तेवढे विकसित झाले नाहीत. ग्रामीण भागातील महिलांसाठी शेती मध्ये काम असतात परंतु तेही ठराविक काळापूरते मर्यादित असतात. त्यांना पूर्ण वेळ काम मिळत नसल्याने ते आपल्या मुलाला सुद्धा कामावर जाण्यास सांगतात.

### ७) आई वडीलांचा मृत्यु

३० टक्के भारतीय हे दारिद्र्य रेषेखाली जीवण जगतात. त्यांना दोन वेळचे जेवन मिळत नाही. जेवन मिळाले तर त्यामध्ये आवश्यक कॉलरीज नसतात. यामुळे व्यक्ति आजारी पडतात. कधी कधी आजारामुळे घरातील कमावत्या व्यक्तिचा मृत्यु होतो. अशावेळी मुलाला कामावर जावे लागते.

### ८) कुटुंबामध्ये लहान मुलांची अधिक संख्या

ग्रामीण भागातील कुटुंबामध्ये मुलांची संख्या जास्त असते. यामागचे कारण आहे की एक तर ते अशिक्षित असतात आणि त्यांना कुटुंब नियोजनाचे महत्व माहित नसते. दुसरे कारण असे की, त्यांचे असे मत असते की जेवढे घरामध्ये जास्त मुले तेवढे जास्त उत्पन्न मिळते अशी त्यांची भावना असते. याच कारणामुळे ते आपल्या मुलाला कामास जाऊ देतात.

### ९) खर्चिक शिक्षण

१४ वर्षा खालील मुलांना प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तिचे केले असले तरी पुस्तके खरीदीसाठी व इतर शैक्षणिक साहीत्य विकत घेण्यासाठी त्यांच्या कडे पैसे नसतात. कायद्याची योग्य अंमलबजावणी होत नसल्यामुळे मुलांना शिक्षण मोफत मिळत नाही, त्यामुळे ते शिक्षणाकडे नकारात्मक दृष्टिकोणातुन पाहतात व शिक्षणाकडे न वळता कामाकडे वळल्या जातात.

### १०) श्रिमंत व्यक्तिकडून कामासाठी लहान मुलांची निवड

श्रिमंत व्यक्ति हे कामासाठी प्रौढ व्यक्तिची निवड न करता लहान मुलांना कामावर ठेवतात कारण, प्रौढ व्यक्तिला कामावर ठेवले तर त्याला जास्त मजूरी द्यावी लागते व तेच काम कमी पैशामध्ये लहान मुलांकडन करुन घेता येते तसेच श्रिमंत व्यक्ती आपल्या घरची कामे जसे बाजार आणणे, गाडी धुणे यासारखी काम फक्त दोन वेळचे जेवन देऊन करुन घेतो.

## बाल कामगार ही सामाजिक समस्या कमी करण्यासाठी उपाययोजना

### १) मोफत शिक्षण

बाल कामगारांना कामापासून दूर करायचे असेल तर त्यांना शिक्षणाच्या प्रवाहामध्ये आणले पाहिजे. यासाठी त्यांना प्राथमिक शिक्षण मोफत द्यावे. भारतीय राज्यघटनेच्या कलम ४५ मध्ये १४ वर्षाखालील मुला मुलींसाठी मोफत आणि आवश्यक शिक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. त्या तरतूदींची प्रभावी अंमलबजावणी व्हायला हवी. तसेच मुलांना शिक्षणाबरोबरच व्यावसायिक कौशल्य प्रशिक्षण द्यायला हवे. कल्याणकारी राज्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सरकार, सेवायोजक, आणि सामाजिक संस्था यांनी सर्व स्तरावर मोफत शिक्षण आणि अन्य आवश्यक त्या गरजांची पूर्तता करायला हवी. १ एप्रिल, २०१० पासून सक्तीचे व मोफत शिक्षणाचा कायदा करण्यात आला आहे. त्याची प्रभाविपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

प्राथमिक शिक्षण हे ऐच्छिक किंवा लोकांच्या मर्जीनुसार ठेवायला नको. प्रत्येकासाठी शिक्षण हे सक्तीचे करायला हवे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते. म्हणजेच आजच्या 'सर्व शिक्षण अभियान' सक्तीचे व मोफत शिक्षण, अल्पसंख्यांकाचे शिक्षण या सर्व उपक्रमांच्या विचारांचा पाया डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षणविषयक विचारात दिसून येतो.

### २) दारिद्र्य निर्मूलन

भारतासारख्या विकसनशिल देशामध्ये बाल कामगारांची समस्या मग ती ग्रामीण भागात असो किंवा शहरी भागात असो तिचे प्रमुख कारण म्हणजे दारिद्र्य होय. दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी सरकारच्या विविध योजना आहेत, परंतु भ्रष्टाचार, व्यावसायिक कौशल्यांचा अभाव, उदासिनता, उद्योजकतेचा अभाव यामुळे अनेक कार्यक्रम प्रत्यक्षामध्ये न येता कागदावरच राहतात. या योजना गरिब लोकांपर्यंत पोहचत नसल्यामुळे मंजुर झालेल्या पैशाचा मोठ्या प्रमाणामध्ये दुरुपयोग होतो. बाल कामगार प्रथा नष्ट करण्यासाठी दारिद्र्य निर्मूलन करणे आवश्यक आहे व यासाठी विविध योजना गरिबांपर्यत पोहचविणे आणि त्यांची योग्य अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

### ३) बेकारीचे निर्मूलन

भारत देश हा सर्व प्रकारच्या संसाधनांनी समृद्ध आहे तरीसुद्धा मानव संसाधनांचा हवा तसा विकास होत नसल्यामुळे बेरोजगारांची समस्या निर्माण झाली आहे. सद्यास्थितीमध्ये भारतात तरुण बेकारांची वाढती संख्या एक गंभीर समस्या आहे. या समस्येचे निर्मूलन करण्यासाठी उद्योग, व्यापारी गरजा आणि शिक्षण संस्थांच्या अभ्यास क्रमामध्ये आवश्यक ते बदल करायला हवे, यामुळे देशातील तरुण वर्गाला रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध होतील व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करुन बेकारीचे उच्चटण करता येईल. प्रौढ आणि तरुण वर्गाला रोजगार उपलब्ध करुन दिल्यास मुलांना त्यांच्या कुटुंबासाठी काम करण्याची गरजच राहणार नाही.

### ४) प्राथमिक आणि प्रौढ शिक्षण

अधिकतर बाल कामगारांचे आई वडील हे अशिक्षित असतात. त्यांचा शिक्षणाविषयी नकारात्मक दृष्टीकोण असतो, म्हणून ते मुलांना शाळेमध्ये न पाठवता कामाला पाठवतात. अशा प्रकारच्या अशिक्षित आई वडीलांना सर्वप्रथम साक्षर करण्याची गरज आहे. याचा परिणाम असा होईल की, प्रत्येक कुटुंब प्रमुख आपल्या मुलांच्या भविष्याबाबत सकारात्मक दृष्टीने विचार करु लागतील व मुलांना शाळेमध्ये पाठवतील, त्यामुळे प्राथमिक शाळामधील मुलांच्या गळतीचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. मुलांमध्ये शाळेविषयी आवड निर्माण झाली की, ते कामाला न जाता शाळेमध्ये जातील.

### ५) सामाजिक जागरुकता

लहान वयामध्ये काम केल्याने मुलांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होतात. बाल वयात रोजगारात राहून संपूर्ण आयुष्याचे नुकसान न करता या वयात त्यांना शिक्षण देऊन बौद्धिक आणि शारीरिकदृष्ट्या सक्षम झाल्यानंतर भविष्यामध्ये तो अधिक उत्पन्न मिळवेल असे मुलांच्या पालकांना पटवून दिले पाहिजे. बाल कामगार हे विविध प्रकारच्या क्षेत्रामध्ये काम करतांना दिसतात, या कामादरम्यान त्यांचे आर्थिक, मानसिक व शारीरिक शोषण केल्या जाते. या शोषणाविषयी समाजामध्ये जागरुकता निर्माण करणे गरजेचे आहे. तसेच बाल कामगारांच्या भविष्याचा विचार करुन सरकार आणि सेवायोजक यांनी देखिल शिक्षणाचे महत्व लक्षात घेऊन आपले सामाजिक दायित्व पूर्ण करायला हवे. अशा प्रकारच्या प्रयत्नामुळे बाल कामगारांची कुप्रथा नष्ट करण्यासाठी पालकामध्ये आणि समाजामध्ये सामाजिक जागरुकता निर्माण करायला हवी.

### ६) प्रसार माध्यमांचा उपयोग

बाल मजूरीची समस्या ही खूप पूर्वीपासून चालत आलेली कुप्रथा आहे. ती नष्ट करण्यासाठी निरंतर प्रयत्नाची गरज आहे. समाजामध्ये हे पटवून दिले पाहिजे की ही वाईट प्रथा असुन यामुळे मुलांचे खूप मोठे नुकसान होते. बाल कामगारांच्या समस्याकडे लोकांचे लक्ष केंद्रीत करण्यासाठी सर्व प्रसार आणि प्रचार माध्यमांचा प्रभाविपणे उपयोग केला पाहिजे. यासाठी नाटके, भजने, पथनाट्ये, भाषणे, पोवाडे, किर्तने, चित्रकला, लोकगीते, चित्रपट आणि वर्तमानपत्रे इत्यादी माध्यमांचा सातत्याने उपयोग करुन समाजामध्ये या समस्यविषयी जागरुकता निर्माण केली पाहिजे.

वर्तमान काळामध्ये जगातील देश जागतिकीकरणाने प्रभावित झाले असुन सुद्धा अनेक समस्यांचा विचार आजही केला जात नाही. बाल कामगारांच्या समस्येची तीव्रता कमी करण्यासाठी गरिब कुटुंबातील मुला मुलींनी नियमितपणे शाळेत पाठवावे. यासाठी प्रभाविपणे योजना राबविण्याची गरज आहे. बाल कामगारांवर पूर्णपणे बंदी घालणे तत्वत: योग्य वाटत असले तरी ते व्यवहारीक दृष्टीकोणातून साध्य करण्यासाठी प्रयत्नाची आवश्यकता आहे. घरची आर्थिक परिस्थिती खालावलेली असल्यामुळे मुलांना कामावर पाठविणाऱ्या पालकांना असे पटवून दिले पाहिजे की, मुलांना कामापेक्षा शिक्षणाची अधिक गरज आहे.

### ७) रोजगाराच्या संधीत वाढ

दारिद्र्य, बेरोजगारी या समस्येप्रमाणेच भारतामध्ये बाल कामगार ही एक समस्या आहे. या कुप्रथेचे समुळ उच्चाटण करण्यासाठी बाल कामगारांच्या आई वडीलांना रोजगार उपलब्ध करुन द्यावा व लहान मुलांना शिक्षणाबरोबरच रोजगार प्राप्तीच्या संधी उपलब्ध करुन देणारे शिक्षण दिले पाहिजे. गरिब मुलांसाठी 'कमवा आणि शिका' यासारख्या योजना राबवायला हव्यात, या सर्वांचा परिणाम असा होईल की, लहान मुलांना स्वत:च्या विकासाबरोबरच देशाच्या आणि सामाजिक विकासात योगदान देता येईल.

### ८) कुटुंबाचा आकार कमी ठेवणे

भारतामध्ये वेगवेगळ्या अभ्यासाच्या निरिक्षणावरुन असे दिसुन येते की, गरिब आणि अशिक्षित कुटुंबाचा आकार मोठा असतो. अशा कुटुंबातील कुटुंब प्रमुखाची अशी धारणा असते की, 'जास्त मुले म्हणजे जास्त उत्पन्न' होय. कारण अशी मुले थोडी मोठी होताच कुटुंबाचा आर्थिक आधार बनतात. अशा वेळी कुटुंब प्रमुखाला योग्य मार्गदर्शन करुन लहान वयात काम केल्यामुळे होणाऱ्या दुष्परिणामाविषयी माहिती द्यावी व कुटुंबाचा आकार नियंत्रणात ठेवण्याचे कायदे सांगावे व समाजामध्ये या समस्येविषयी जनजागृती करावी.

### ९) आंगणवाडीला जोडूनच प्राथमिक शाळा उभारणे

ज्या मुला-मुलींना आपल्या लहान भावंडाना सांभाळण्यासाठी प्राथमिक शाळेमध्ये जाता येत नाही, त्यांच्यासाठी निरंतर शिक्षण व्यवस्थेतर्फे आंगणवाडीला जोडून तीन ते चार तास प्राथमिक शिक्षण देण्याची व्यवस्था केल्यास अशा मुलांना प्राथमिक शिक्षण घेता येईल.

### निष्कर्ष

मुले ही राष्ट्राची संपत्ती आहेत, आणि या संपत्तीकडे दुर्लक्ष करुन कोणत्याही राष्ट्राला स्वत:चा भविष्यातील विकास करुन घेता येणार नाही. परंतु प्राचीन काळापासून मुलांच्या सर्वांगिण विकासाकडे आवश्यक तेवढे लक्ष दिले गेले नाही. बालकांच्या विकासावर परिणाम करणारे अनेक घटक आहेत. समाजाच्या दृष्टीने बालक हा भविष्यातील संपत्ती आहे तरीसुद्धा समाजाने या बालकांवर कामाचे ओझे लादले व यामुळे बालकांवर शारीरिक व मानसिक दुष्परिणाम झाले. बाल कामगार ही समस्या फक्त भारताशीच संबंधित नसून ती एक जागतिक समस्या बनली आहे. बाल कामगार ज्या ठिकाणी काम करतात ते धोकादायक असतात. काही उद्योग वरवर धोकादायक वाटत नसले तरी त्यामध्ये काहीतरी प्रमाणामध्ये धोका असतोच. कारखान्यामध्ये काम करणाऱ्या बाल कामगारांच्या शारीरिक दुष्परिणामाचा विचार केला तर असे दिसुन येते की, बाल कामगार हे अनेक आजारांना बळी पडले आहेत. कारखान्यात काम करणाऱ्या बाल कामगारांना डोळ्याचे आजार, ब्रोंकाइटिस, अस्थमा यासारख्या आजारांचा सामना करावा लागतो. कारखान्यामध्ये काम करणाऱ्या बाल कामगारांची स्थिती अत्यंत दयनीय असुन त्यांना खोकला, त्वचारोग अशा प्रकारच्या आजाराला बळी पडावे लागते. डोक्यावर वजनी वस्तू उचलणे, एखादी वस्तू ओढण्यासाठी जोर लावणे, ज्वलनशील भट्ट्यामध्ये काम करणे इत्यादी कामामुळे त्यांच्या शरीरावर विपरीत परिणाम होऊन त्यांचे आयुष्य कमी होते.

**संदर्भसूची :**


१. वाणी उमेश (२०१४): “बाल मजुरी आणि कृषी क्षेत्र”, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद. पृष्ठ क्र. ६४.
२. रोडे विजयकुमार (२०१३): “आर्थिक विकास: एक चिंतन”, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद. पृष्ठ क्र. ३१४.
३. कौशिक आशा (२००४): “मानवाधिकार और राज्य”, पोइन्टर पब्लिशर्स, जयपुर पृष्ठ क्र. १५८.
४. शिवचरण सिंह ‘पिपिल’(२०१२): “आधुनिक भारत में बाल श्रमिक”, तरुनम पब्लिकेशंस, नोएडा, पृष्ठ क्र. ०७.
५. रोडे विजयकुमार (२०१३): “आर्थिक विकास: एक चिंतन”, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद. पृष्ठ क्र. ३१५, ३१६.
६. धडफळे मोहन (२००५): “बाल कामगार विशेषांक”, यशमंथन, पुणे. पृष्ठ क्र. ५, ६.
७. देशपांडे के.ना., माळी आ.ल.(२००७): “भारतीय शिक्षणाचा इतिहास”, नित्य नूतन प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. १४८.
८. कुलकर्णी शालिनी (२००९): “भारतीय व पाश्चात्त्य शिक्षणतज्ज्ञ”, नित्य नूतन प्रकाशन, पुणे. पृष्ठ क्र. ८१.
९. बोधनकर सुधीर, चव्हाण साहेबराव (२००८): “श्रम अर्थशास्त्र”, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
१०. आगलावे प्रदीप (२००८) : “सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे”, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
११. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०२० जिल्हा वर्धा.
१२. भारतीय जनगणना १९७१ ते २०११.
१३. Chhina S.S. (2009): “Child Labour Problem And Policy Implications”, Regal Publications, New Delhi, Page no. 65, 75.
१४. Varandani G. (1994) : “Child Labour and Women Worker, Ashish Publishing House, New Delhi. Page no. 55.
१५. Census of India, 2001 & 2011, RGI Government of India.
१६. http://www.bba.org.in